# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.10.2024** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू अल्जेरिया दौऱ्यावर, भारतीय समुदायाशी साधला संवाद
2. पी एम गतीशक्ती बृहद् आरखड्यामुळे विकसित भारत उपक्रमाला नवी गती मिळेल-पंतप्रधानांचा विश्वास
3. जम्मू-काश्मीर मधील राष्ट्रपती राजवट रद्द, नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा
4. महिला टी -20 विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलिया संघाची भारतीय संघावर मात आणि
5. पुढील चार दिवसांत देशाच्या दक्षिणेकडील राज्यांत मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**राष्ट्रपती अल्जेरिया**

अल्जेरिया, मॉरिटानिया आणि मलावी या तिन्ही देशांच्या आठवडाभराच्या दौऱ्याचा एक भाग म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू काल संध्याकाळी अल्जेरियाची राजधानी अल्जेयर्स इथं पोहोचल्या असून, काल त्यांनी येथील भारतीय समुदायाशी संवाद साधला. या वेळी केलेल्या भाषणात, अल्जेरियाच्या स्वातंत्र्यापासून उभय देशांदरम्यान घनिष्ट संबंध कायम असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. भारतीय समुदाय, भारताचं हित आणि संस्कृति पुढे नेत असल्याबद्दल त्यांनी भारतीय समुदायाची प्रशंसा केली. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, 16 ऑक्टोबरला राष्ट्रपती मॉरिटानियाला भेट देणार असून, 17 ते 19 ऑक्टोबर दरम्यान, त्या मलावीला भेट देतील. या देशांच्या भेटीदरम्यान, राष्ट्रपती तिथल्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत तसंच आणि व्यापार आणि उद्योग प्रमुखांच्या भेटी घेणार आहेत.

**पीएम-गतीशक्ती**

पीएम गतीशक्ती बृहद् आराखडा सर्व क्षेत्रात वापरला जात आहे यामुळे विकसित भारत उपक्रमाला नवीन गती मिळेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं असलेल्या पीएम गतीशक्ति अनुभूती केंद्राला मोदी यांनी काल भेट दिली. पीएम गतीशक्तीची मुख्य वैशिष्ट्ये, यश आणि मुख्य टप्पे या अनुभूती केंद्रात दर्शवले आहेत. पीएम गतीशक्ती बृहद् आराखड्याला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. या उपक्रमामुळे देशभरातील प्रकल्पांचे वेगवान नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये झालेल्या प्रगतीची त्यांनी प्रशंसा केली. पंतप्रधानांनी एक जिल्हा एक उत्पादन अर्थात ओ डी ओ पी अनुभूति केंद्रालाही भेट दिली आणि विविध जिल्ह्यांत उत्पादित होणाऱ्या उत्पादनांची निवड, त्यांचं ब्रँडिंग आणि जाहिरातीत मदत करण्यासाठी ओ डी ओ पी उपक्रमाने केलेल्या प्रगत वाटचालीचं त्यांनी कौतुक केलं.

**ओमबिर्ला-जिनिव्हा**

आंतरसंसदीय संघाच्या जिनिव्हा इथे होणाऱ्या एकशे एकोणपन्नासाव्या परिषदेत, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधिमंडळ सहभागी होत आहे. 17 ऑक्टोबरपर्यन्त चालणाऱ्या या परिषदेत, शांततापूर्ण आणि शाश्वत भविष्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचा वापर ही या परिषदेची संकल्पना आहे. या प्रतिनिधिमंडळात 180 संसद सदस्य आणि 18 सहयोगी सदस्यांचा समावेश आहे.

**जम्मू-काश्मीर-राष्ट्रपती राजवट**

केंद्र सरकारनं जम्मू-काश्मीरमधील राष्ट्रपती राजवट रद्द केली असून आता इथं नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र सरकारनं यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू-

काश्मीरमध्ये नवीन सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीला बहुमत मिळालं आहे.

**<u>रिजीजू</u>**

26 नोव्हेंबर रोजी संविधानाला 75 वर्ष पूर्ण होत आहेत. या निमित्ताने केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते काल महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर इथं झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारण्यात येणार असल्याचं रिजीजू म्हणाले. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहनही रिजीजू यांनी केलं.

**<u>जाजू</u>**

माहिती प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या विविध विभागांनी केंद्र सरकारच्या योजना चांगल्या रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी केलं. नागपूर आकाशवाणी केंद्रात काल माहिती प्रसारण मंत्रालयाच्या विविध कार्यालय प्रमुखांची आणि अधिकाऱ्यांची त्यांनी आढावा बैठक घेतली; त्यावेळी ते बोलत होते. यानंतर संजय जाजू यांनी आकाशवाणीतील स्टुडिओ तसंच परिसराची पाहणी केली. स्वच्छता अभियान त्याचप्रमाणे एक पेड मा के नाम या उपक्रमात देखील माहिती प्रसारण मंत्रालयाच्या विभागांनी सक्रीय सहभाग नोंदवल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>इस्राएल- ड्रोनहल्ला</u>**

मध्य-उत्तर इस्रायलमधील लष्करी तळावर काल रात्री हेजबोलाने केलेल्या ड्रोन हल्ल्यात किमान चार इस्रायली सैनिक ठार झाले आणि 58 हून अधिक जण जखमी झाले. दरम्यान, गुरुवारी इस्रायलने केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला करण्यात आल्याचं लेबेनॉनस्थित हेजबोला या दहशतवादी गटाने सांगत, रेडियो संदेशाद्वारे या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्याचा दावा केला आहे.

**<u>इस्राएल-शांतीसेना</u>**

दरम्यान, संयुक्त राष्ट्र संघाच्या दक्षिण लेबेनॉनमधील शांती सेना तिथून दूर हलवण्याची विनंती इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष बेजामीन नेतन्याहू यांनी संयुक्त राष्ट्र संघांचे अध्यक्ष आंतोनियो गुटेरास यांना काल केली. गेल्या काही दिवसांत इस्रायलने लेबेनॉन मध्ये केलेल्या गोळीबारात शांतीसेनेचे पाच जवान जखमी झाले, मात्र तरीही शांतीसेनेने मागे हटण्यास नकार दिल्याच्या पार्श्वभूमीवर ही विनंती करण्यात आली आहे. इस्राएल आणि लेबेनॉन मधील संघर्षात शांतीसेनेची हानी होऊ नये हा या विनंतीमागचा उद्देश आहे.

**<u>गाझा-गोळीबार</u>**

मध्य गाझा पट्टीतील नुसेरात इथल्या निर्वासित शिबिरातील विस्थापित लोकांच्या शाळेवर इस्रायलने केलेल्या गोळीबारात किमान 19 पॅलेस्टिनी ठार आणि 80 जण जखमी झाल्याचं पॅलेस्टीनी सूत्रांनी सांगितलं आहे. मृतांमध्ये विशेषतः महिला आणि बालकांचा समावेश आहे.

**<u>अमेरिका-भारत बैठक</u>**

अमेरिका आणि भारत यांच्यातील धोरणात्मक भागीदारी मंचातर्फे आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक शिखर परिषदेला काल नवी दिल्लीत सुरुवात झाली. द्विपक्षीय व्यापार, पुरवठा साखळी, सेमीकंडक्टर गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञान सहकार्य वाढवणे हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या अमेरिका दौऱ्यानंतर ही परिषद होत आहे.

**भाजपा निरीक्षक**

हरियाणा भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी भाजपने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. तर, जम्मू-काश्मीर मधील विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**अंमली पदार्थ जप्त-गुजरात, आसाम**

केंद्र सरकारच्या अमली पदार्थ आणि नशा मुक्त भारत अभियानाच्या अंतर्गत, दिल्ली पोलिसांचा विशेष कक्ष आणि गुजरात पोलिसांनी गुजरातमधून 518 किलोग्राम कोकेन जप्त केलं आहे. गुजरातमधील अंकलेश्वर येथील एका औषध कंपनीतून जप्त केलेल्या या कोकेनची अंदाजे किंमत सुमारे पाच हजार कोटी रुपये आहे. चौकशीदरम्यान, जप्त केलेली औषधं गुजरातमधील अंकलेश्वर इथून आल्याचं उघड झालं होतं. दरम्यान, आसामच्या करीमगंज जिल्ह्यात, पोलिसांनी मिझोरामकडून आलेल्या वाहनातून अंदाजे साडे चार कोटींचे अंमली पदार्थ, जिल्हा पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी चार जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

**नेमबाजी विश्वचषक**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पोर्ट फेडरेशन अंतर्गत, 2025 मध्ये होणाऱ्या कनिष्ठ गटाच्या विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताला देण्यात आल्याचं फेडरेशनचे अध्यक्ष लुसियानो रॉसी यांनी जाहीर केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. नेमबाजी खेळात भारतीय खेळाडू करत असलेल्या चमकदार कामगिरीचं रॉसी यांनी यावेळी कौतुक केलं.

**टेबल टेनिस**

कझाकस्तानमधील अस्ताना इथे झालेल्या आशियाई टेबल टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरी गटात, उपांत्य फेरीत दाखल झालेल्या भारताच्या अह्यीका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीने कास्य पदक जिंकत, इतिहास रचला आहे. या स्पर्धेत महिला दुहेरीत भारताने पहिल्यांदाच पदक पटकावलं आहे. उपांत्य फेरीत, या जोडीला जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियुउ किहारा या जोडीकडून 0-3 ने पराभव पत्करावा लागला.

**महिला क्रिकेट**

महिला T20 क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, शारजाह इथं काल रात्री झालेल्या अ गटाच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा नऊ धावांनी पराभव केला. 152 धावांचा पाठलाग करताना भारतानं वीस षटकांत नऊ बाद 142 धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरनं नाबाद 54 तर दीप्ती शर्मानं 29 धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं 20 षटकांत आठ गडी गमावून 151 धावा केल्या.

**हवामान**

पुढील चार दिवसांत तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, केरळ आणि किनारी आंध्र प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तसेच येत्या आठवडाभरात गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड येथे हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, नैऋत्य मान्सून बिहार, झारखंड, संपूर्ण पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा, आसाम आणि मेघालयच्या उर्वरित भागातून परतला असल्याचं आयएमडीने म्हटले आहे की, नैऋत्य मान्सून पुढील दोन दिवसांत देशाच्या उर्वरित भागांतून माघार घेण्याची शक्यता आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**